## ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाच्यासमक्ष
## बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम

(विद्युत अधिनियम,२००३ मधील कलम ४२ च्या उपकलम ५ नुसार प्रस्थापित केलेल्या )

तळ मजला, बहुमजली विस्तारीत इमारत,
बेस्ट कुलाबा आगार,
कुलाबा, मुंबई - ४०० ००१
दुरध्वनी क्रमांक २२८५३५६१

**प्रतिनिधीत्व क्रमांक एन- सिम्हा-१०६-१०दि.१७.०९.२०१०**

श्रीमती वि.बा. शेळके, श्री. ह.ल.ओव्हळ, श्री. सु.गे.गायकवाड,
श्रीमती अ.खं.जाधव, श्री. सि.प.निषाद, श्री.बा.स.आंधळे, … … … … फिर्यादी
श्री.भि.पं.खामकर, श्री. शा.वा.शेवाळे आणि श्री.अ.ह.अन्सारी

विरूध्द

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम … … … … … प्रतिवादी

**उपस्थित**

| | |
|---|---|
| गणपूर्ती | : १. श्री. र.उ.इंगुले, अध्यक्ष<br>२. श्री. सु.प्या.गोस्वामी, सदस्य<br>३. सौ.वर्षा व. राऊत, सदस्या |
| फिर्यादीच्या वतीने | : श्री. दिनेश पांडूरंग शूरकर |
| प्रतिवादीच्या वतीने | : १. श्री. पराग के. बनसोडे<br>विभागीय अभियंता, ग्राहक सेवा (सिम्हा)<br>२. श्री. एन.एम्. गारसेलवार<br>सहाय्यक अभियंता, ग्राहक सेवा (सिम्हा) |
| सुनावणी दिनांक | : २०/१०/२०१० |
| निर्णय दिलेली दिनांक | : ०३/१२/२०१० |

## अध्यक्ष श्री.र.उ.इंगुले यांनी दिलेला निर्णय

श्रीमती वि.बा. शेळके, श्री. ह.ल.ओव्हळ, श्री. सु.गे.गायकवाड, श्रीमती अ.खं.जाधव, श्री. सि.प.निषाद, श्री.बा.स.आंधळे, श्री.भि.पं.खामकर, श्री. शा.वा.शेवाळे आणि श्री.अ.ह.अन्सारी, राहणार तुळशी वाडी, दामजीभाई राठोड मार्ग (अप्रोच /ऑर्थर रोड), ताडदेव, मुंबई - ४०० ०३४. चे रहिवाशीं आपली वीजमापकें बेस्टच्या सिम्हा ९७ योजनेखाली बसवून देणे, अचानक वीजपुरवठा खंडीत होणे व नविन वीजजोडणी मिळविण्याकरीता सन १९९५ पुर्वीचा अधिवास पुरावा किंवा जमिन मालकाचे ना हरकत पत्र सादर करणे याविषयीचे आपले गाऱ्हाणे मंच्याकडे घेऊन आले.

## फिर्यादीने दाखल केलेले निवेदन संक्षिप्त स्वरूपात खालील प्रमाणे

१. तक्रारदारानुसार श्रीमती वि.बा. शेळके, श्री. ह.ल.ओव्हळ, श्री. सु.गे.गायकवाड, श्रीमती अ.खं.जाधव, श्री. सि.प.निषाद, श्री.बा.स.आंधळे श्री.भि.पं.खामकर, श्री. शा.वा.शेवाळे आणि श्री.अ.ह.अन्सारी हे गेली अनेक वर्षे तुळशीवाडी, दामजीभाई राठोड मार्ग (अप्रोच /ऑर्थर रोड), ताडदेव, मुंबई - ४०० ०३४ येथे राहत असून बेस्ट उपक्रमाचे ग्राहक आहेत.

२. तक्रारदारानी आपल्या निवेदनात असे नमूद केले आहे कि, त्यांची वीजमापकें एकत्रितरित्या केबीन मध्ये बसवून त्यांना वीज जोडणी देण्यात आलेली आहे. सदर केबीनमध्ये प्रतिवादी बेस्ट उपक्रमाने वीजवाहिनीची क्षमता लक्षात न घेता खूप जास्त संख्येने वीजमापकें मंजूर करून बसविलेली आहेत. संपूर्ण परिसरात केवळ चार केबीन बसविलेल्या आहेत. या सर्व केबीनच्या वीज वाहिनीवर क्षमतेपेक्षा खूप भार देण्यात आल्याने सदर वीजवाहिनी वारंवार जळत आहे. त्यावर तात्पुरत्या स्वरूपात दुरूस्ती / जोडणी करून वीजपुरवठा सुरळीत केला जातो. परंतु तो जास्त काळ टिकत नाही परतु काही काळाने सदर जोडणी जळून जाते.

३. तक्रारदारानुसार सदर केबीन मधील वीजमापकांपासून त्यांच्या घरापर्यंत येणाऱ्या वीज वाहिनीस काही असामाजिक प्रवृत्तीचे लोक व समाजकंटक अवैधरित्या जोडणी देऊन वीज चोरी करीत असतात व त्याची संपूर्ण वीज देयकें तक्रारदारकास भरावी लागतात. तसेच केबीन त्यांच्या घरापासून दूर असल्याने तक्रारदार वीजमापकांवर व वीज वाहिनीवर योग्य प्रमाणात लक्ष देऊ शकत नाही. त्याचप्रमाणे सदर वीजवाहिनी कालांतराने आधारापासून तुटून लटकत्या अवस्थेत रहातात. दरम्यानच्या घरांची दुरूस्ती झाल्यानंतर वीजवाहीनी परत बसविता येत नाहीत.

४. तक्रारदारानुसार उपरोक्त दोन्ही प्रकारांमुळे त्यांच्या घरातील चालू स्थितीतील उपकरणे जसे मिक्सर, फ्रिज, पंखे, दिवे इ. अचानक वीज पुरवठा खंडीत होत असल्याने खराब होऊन नादुरूस्त होत आहेत त्याचा त्याना दर महिन्यास साधारण दोन-तीन हजार रूपयांचा भुर्दंड भरावा लागत आहे. सर्व अडचणी / त्रास / भुर्दंड लक्षात घेता तक्रारदाराची वीजमापकें त्यांच्या घराजवळ सिम्हा ९७ प्रकारात बसविण्याकरिता अर्ज केलेले आहेत त्यास आठ महिने होऊन सुध्दा या संबंधी काहीच करवाई केलेली नाही.

५. तक्रारदारानुसार वीज गळतीमुळे त्यांना अपेक्षीत व ठरवून दिलेला विद्युतदाब पुर्ण वेळ उपलब्ध होत नाही त्यामुळे उपक्रमाची तसेच ग्राहकांची आणि पर्यायाने राष्ट्रीय संपतीची हानी होत आहे. ती हानी टाळण्याकरिताच सिम्हा ९७ ही योजना उपक्रमातर्फे तयार करून राबविण्यात येत असल्याचे व या योजनेअंतर्गत विद्युतभार मंजूर करण्याकरिता कोणतीही मर्यादा नसल्याचे प्रतिवादी बेस्ट उपक्रमाच्याच अहवालात नमूद करण्यात आलेले असूनसुध्दा त्याकडे संबधित प्रतिवादी बेस्ट उपक्रमाचे अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असून आम्हा ग्राहकांचे आणि राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान करत आहेत. त्याबद्दल त्यांच्यावर योग्य ती सनदशीर आणि कडक कारवाई करावी त्यामुळे ते परत अशा बेपर्वाईने उपक्रमाचे आणि राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान करायला धजवणार नाहीत.

६. तक्रारदारानुसार, प्रतिवादी बेस्ट उपक्रमाच्या ग्राहक सेवा विभागातून ग्राहकांच्या सोयी सुविधा यांचा काहीच विचार न करता वीज पुरवठा कोणत्याही प्रकारे मनमानी पध्दतीने देण्यात येतो. त्यामध्ये होणारी वीज गळती, विद्युत संच मांडणी बिघाड या सारखे भुर्दंड शेवटी ग्राहकांच्याच वीज देयकांतून वसुल करण्यात येत असतात. मुळात सिम्हा ९७ ही योजना वीजमापकें घराच्या अगदी जवळ बसवावीत आणि वीज वाहिन्या लटकत्या स्थितीत राहू नयेत, म्हणून राबविण्यात आली आहे. त्यामध्ये उपक्रमाचा फायदाच आहे व केबीनमध्ये वीज जोडणी दिल्याने उपक्रमाचा जो तोटा होतो तो अप्रत्यक्षरित्या आम्हा ग्राहकांच्या माथी मारला जातोच परंतु वीजमापकें चोरी होणे, वीजवाहिन्या तुटणे, त्यास अवैध जोडणी देणे किंवा घरातील उपकरणे खराब होणे असा प्रत्यक्ष भुर्दंडही बसत आहे.

७. तक्रारदारानुसार, प्रतिवादी बेस्ट उपक्रमाच्या विभागीय अभियंता 'सिम्हा' यांच्या ग्राहक सेवा (सिम्हा) प्रशा.४३/९०८/२०१० या पत्रात निखालस खोटी माहिती नमुद करण्यात आलेली आहे. त्यात समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याऐवजी तात्पुरते व तकलादू उपाय सूचविण्यात आलेले आहेत. सदर उपाययोजना आधिपासूनच अवलंबिली असून त्यातील दिरंगाई, वेळी अवेळी समस्या उद्‌भवणे व उपरोक्त कारणामुळे तक्रारदार अत्यंत त्रस्त आहेत. त्याचप्रमाणे प्रतिवादी बेस्ट उपक्रमाने नमुद केल्याप्रमाणे तक्रारदांराना २५.०५.२०१० रोजीचे कोणतेही पत्र मिळालेले नाही व परस्पर त्याचे अर्ज रद्द करण्यात आले आहेत, त्याऐवजी त्यांना वरील पत्र मात्र त्यांच्या पत्यावर मिळालेले आहे.

८. तक्रारदारानुसार, त्यांनी अनुसूची 'क' अर्जात नमुद केल्याप्रमाणे वारंवार होत असलेल्या वीज पुरवठ्यातील बिघाडामुळे त्यांच्या घरातील उपकरणांचे जे काही नुकसान होत आहे त्याचे त्यांना होत असलेल्या मानसिक, शारीरिक त्रास, तक्रार निवारण्याकरिता होणारा प्रवास खर्च, त्याकरिता नोकरी / व्यवसायात नुकसान करून कार्यालयात जावे लागणे याची उचित भरपाई त्यांना मिळावी. तसेच काही अपघात होऊन त्यांच्या मालमत्तेची हानी झाल्यास किंवा जीवित हानी झाल्यास त्याची जबाबदारी प्रतिवादिच्या कोणत्या अधिकाऱ्याची असेल ते निश्चित करावे. त्याचे अर्ज सर्व परिस्थिती अनुकूल असताना विनाकारण प्रलंबित ठेवण्यात आलेले आहेत त्यामुळे झालेले नुकसान व होणारे नुकसान यांची योग्य तरतुद करून ती फिर्यादीना मिळेल अशी व्यवस्था करून द्यावी आणि संबंधित अधिकाऱ्यांनी कर्तव्यात हलगर्जीपणा केल्याबद्दल त्यांचेवर नियमानुसार जास्तीत जास्त कडक कारवाई करावी अशी विनंती केली आहे.

९. तक्रारदारानुसार, अर्जदारांपैकी काही अर्जदारानी नवीन विज जोडणी मिळण्याकरिता अर्ज केलेले आहेत, त्याना प्रतिवादी बेस्ट उपक्रमातर्फे कळविण्यात आले आहे की, १९९५ च्या पूर्वीच्या अधिवास पुरावा सादर करावा अन्यथा जमिन मालकाचे ना हरकत पत्र द्यावे या दोन्ही बाबी सादर करणे या गरीब हलाकीत रहाणाऱ्या अर्जदारास अशक्य आहे, अर्जदारांना बाजूच्या अन्य वीज जोडणी धारकांकाडून नाईलाजाने बिलाच्या कित्येक पटीने जास्त रक्कम देऊन वीज घ्यावी लागत आहे. त्याचप्रमाणे कोणत्याही कारणास्तव प्रतिवादी बेस्ट उपक्रमाला अर्जदारांना वीज जोडणी देणे किंवा ग्राहकांच्या सोयी प्रमाणे सेवा देणे अशक्य असल्यास इतर वीज पुरवठादारांकडून विज जोडणी मिळत असेल तशी

घेण्यास हरकत नसल्याचे पत्र संबंधित प्रतिवादीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून त्यांना उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यांची विनंती फिर्यादीने केली आहे.

**<u>प्रतिवादी बेस्टने लिखित स्वरूपात दाखल केलेले निवेदन संक्षिप्त स्वरुपात खालीलप्रमाणे</u>**

१०. प्रतिवादी (बेस्ट उपक्रम) ने असे उल्लेखित केले आहे की, फिर्यादीचे मागणी अर्ज हे वीजमापकें सध्याच्या सधारणा केबिनमधून सिम्हा ९७ या योजनेत स्थलांतरीत करण्यासाठी नोंदविण्यांत आले होते. फिर्यादींच्या मागणी अर्जाच्या संदर्भामध्ये प्रतिवादीच्या अधिकाऱ्यांनी अर्जदारांचे प्रतिनिधी श्री. दिनेश शुरकर यांच्यासमवेत दि. ०३.०२.२०१० रोजी संयुक्त पहाणी केली. पहाणीत असे आढळले की, सदर विभागामध्ये १५०-२०० झोपड्या आहेत. तेथील सर्व झोपड्यांना वेगवेगळ्या केबिनमधील संधारणांद्वारे विद्युत पुरवठा होत आहे व संधारणेची स्थिती ही सर्वसामान्य आहे.

११. प्रतिवादीनी जागेची पहाणी करून विस्तृत अहवाल प्रशासनाच्या माहितीसाठी व अभिप्रायासाठी सादर केला होता व या प्रकरणामध्ये योग्य मार्गदर्शनपर सूचनांची विनंती करण्यात आली होती. या संदर्भामध्ये उपक्रमाचे उप महाव्यवस्थापक (वि.पु.) यांचे खालीलप्रमाणे मार्गदर्शन प्राप्त झाले आहे.

११.१ ग्राहकांची विद्युत पुरवठ्याची जागा संधारण केबिनपासून अतिदूर व जीर्ण अवस्थेत असेल तर काही अपवादात्मक परिस्थितीत व उपक्रमाच्या ऐच्छिक अधिकारात काही वीजमापकांचे स्थलांतर सिम्हा-९७ मध्ये केले जावू शकते व ही योजना राबविताना त्याचा आर्थिख बोजा उपक्रमावर विनाकारण जास्त पडता कामा नये. याबाबत उपक्रमाचा निर्णय हा वीजग्राहकास बंधनकारक असेल.

१२. प्रतिवादीनुसार फिर्यादीचे मागणी अर्ज हे प्राप्त झालेल्या वरील मार्गदर्शक तत्वात न बसल्यामुळे सदर बाब अर्जदारास पत्राद्वारे कळवून त्याचे मागणी अर्ज रद्द करण्यात आले आहेत.

१३. फिर्यादीने तक्रार पत्रामध्ये उल्लेख केलेल्या जागेवर जावून प्रतिवादीने पुन: पहाणी केली असता असे आढळते की, तक्रारीत नमूद केलेल्या दोन्हीही संधारणा ह्या थोड्या प्रमाणात खराब स्थितीत असून त्या केबिनची दुरूस्ती सहज होवू शकते.

१४. प्रतिवादीनुसार वारंवार वीज जाण्याची तक्रार ही संधारणेची क्षमता वाढवून मोठ्या क्षमतेची संधारणा टाकून किंवा तिन्ही फेजवर असणारा असमान विद्युतभार समान करून तक्रारीचे निरसन केले जावू शकते. ह्या संधारणेवर सध्या असलेल्या वीजमापकांची संख्या व त्यावरील विद्युतभार तांत्रिकदृष्ट्या संधारणेच्या क्षमते पर्यत आहे. फिर्यादी ग्राहकानी वाढविलेला अधिक विद्युतभार अधिकृतपणे वाढवून न घेता मंजूर विद्युतभारापेक्षा अधिक विद्युतभार वापरात असल्याचे प्रतिवादीस निदर्शनास आले.

१५. प्रतिवादीनुसार नविन वीजमापक देताना त्या संधारणेवर असलेला एकूण विद्युतभार, असलेली वीजमापके तसेच संधारणेची क्षमता आणि वीजमापक बसविण्याची जागा या सर्व बाबींचा सामुहिकदृष्टया व तांत्रिक बाबी लक्षात घेवून वीजजोडणी देण्यात येते.

१६. प्रतिवादीनुसार सदर दोन्ही संधारणा ज्यावेळी टाकण्यात आल्या त्यावेळी तेथे अनधिकृत प्रकारचे बांधकाम नव्हते. परंतु कालांतराने त्या ठिकाणी अनाधिकृत बांधकाम करण्यात आले. सदर संधारणा किंवा केबिनची सुरक्षितता व देखभाल करणे ही वीजग्राहकाची जबाबदारी आहे. फिर्यादीच्या घरापर्यंत जाणाऱ्या विद्युत तारखंडाची (लीड वायर्स) देखभालसुध्दा फिर्यादीनेच करायची आहे.

१७. प्रतिवादीनुसार सिम्हा-९७ ही योजना मुख्यत: झोपडपट्टी विभागात नविन वीजपुरवठा करण्याकरिता आहे. तसेच ज्या संधारणा अतिशय जीर्ण अवस्थेत म्हणजेच दुरूस्ती करण्यापलीकडे आहेत, अशा संधारणेवरील जेवढ्या वीजमापकाची घरे संधारणेपासून फार लांब आहेत गरजेनुसार केवळ अशाच वीजमापकांच्या स्थलांतराकरिता नविन सिम्हा-९७ योजना राबविण्यात येत. भारतीय विद्युत कायदा-२००३ कलम-४२ अन्वये वीजपुरवठादाराने (Licensee) आपल्या विद्युत व्यवस्थेत सुधारणा करून ती कार्यक्षम आणि आर्थिकदृष्या स्वस्त परवडण्याजोगी बनविणे हे त्यांचे कर्तव्य आहे. त्यानुसार जुन्या ग्राहकांकरिता ही योजना अवलंबिली जात नाही

१८. वीजपुरवठा कोणत्या संधारणा प्रकारात द्यावा ही बाब प्रतिवादी उपक्रमाच्या अखत्यारितील असून, तांत्रिक व आर्थिक दृष्ट्या संपूर्णपणे विचार करून ग्राहकाचा नविन वीजपुरवठा किंवा जुन्या वीजपामकाचे स्थलांतर कोणत्या प्रकारात द्यावे ह्याचा विचार केला जातो. त्यावेळी वीजग्राहक व उपक्रम या दोन्ही बाजूचा योग्य तो विचार केला जातो.

१९. नविन अर्जदारानी वीजपुरवठ्यकरिता दि.०१.०१.१९९५ पूर्वीचा रहिवाशी असल्याचा पुरावा देणे हे महाराष्ट्र सरकारच्या धोरणानुसार आहे. त्यासंदर्भामध्ये उपक्रमाने परिपत्रक जारी केले आहे. त्यानुसार १९९५ पूर्वीचा अधिवासाचा पुरावा देणे हे केवळ नविन वीजजोडणीकरिता आवश्यक आहे.

२०. वरील सर्व बाबींचा विचार केला असता प्रतिवादी उपक्रमाचा अभिप्राय असा आहे की सिम्हा-९७ ही योजना झोपडपट्टीतील नविन रहिवाशांसाठी राबविलेली जाते. सर्वसाधारणत: सदर योजना जुन्या वीजग्राहकांचे वीजमापक स्थलांतरीत करण्यासाठी वापरली जात नाही. सिम्हा-९७ ही योजना राबविण्याकरिता लाखो रूपयांचा खर्च येतो. तो खर्च अंतिमत: सर्व वीजग्राहकांना सहन करावा लागतो. सदर तक्रारदारांचा विद्युत पुरवठा ज्या संधारणेवर चालू आहे त्यापासून त्यांच्या घराचे अंतर सरासरी ३०-४० मीटरच्या आसपास आहे. सिम्हा-९७ ह्या योजनेत सदर विभागात अस्तित्वात असलेले सिम्हा-९७ मीनीपीलर यापेक्षा अधिक अंतरावर आहे व रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला आहे. ह्या फिर्यादी ग्राहकाकरिता नविन योजना राबवावी लागेल. तसेच तक्रारदाराची घरे विखुरलेली असून त्यांना विद्युत पुरवठा एका सिम्हा बॉक्समधून देता येणे शक्य नाही. ग्राहकांना होणारा विद्युत दाब ग्राहकांच्या घरी मोजला असता असे आढळून आले की, विद्युतदाब सरासरी २३० व्होल्टस् आहे व तो मान्य विद्युत दाबाइतकाच आहे. प्रतिवादीनुसार सदर भागात नविन सिम्हा-९७ योजना राबविण्याच्या ऐवजी अस्तित्वात असलेल्या केबिनची दुरूस्ती करून व त्यावरील तिन्ही फेजवर विद्युतभार समान करून वारंवार विद्युत पुरवठा खंडीत होण्याची समस्या सहज सुटू शकते किंवा आवश्यकता वाटल्यास संधारणेची क्षमता वाढविता येऊ शकते.

## कारण मिमांसा

२१. तक्रारदारानतर्फे त्यांचे प्रतिनिधी श्री. दिनेश पांडूरंग शूरकर तसेच जाबदेणार बेस्ट उपक्रमातर्फे त्यांचे प्रतिनिधी श्री. पराग के. बनसोडे, विभागीय अभियंता, ग्राहक सेवा (सिम्हा), श्री. एन.एम्. गारसेलवार,सहाय्यक अभियंता, ग्राहक सेवा (सिम्हा), यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. तसेच या मंचा समोर सादर करण्यात आलेले सर्व कागदपत्रे अभ्यासण्यात आलेली आहेत.

२२. प्रथमदर्शनीच या मंचास तक्रारदारांच्या प्रस्तुत तक्रारीमधील कथन व मागणी, ही अवास्तव व अयोग्य असलेली आढळून येत आहे. प्रथमत: " सिम्हा-९७ योजना " जाबदेणाराच्या वतीने कार्यान्वयीत आणण्या मागचा हेतू व कारणे व त्याचा आवाका विचारांत घेणे आवश्यक असलेचे या मंचास आढळून येत आहे.

२३. तक्रारदारांने सादर केलेल्या ' सिम्हा-९७ ' या योजने अतंर्गत झोपडपट्टी क्षेत्रामध्ये विद्युत पुरवठा देण्याबाबदचा अहवालावरून तसेच जाबदेणार बेस्ट उपक्रम यांनी सादर केलेल्या लेखी म्हणण्यावरून असे आढळून येत आहे कि ही योजना मुळात ' झोपडपट्टी ' करीता लागू करणेत आलेली आहे. झोपडपट्टी क्षेत्रामध्ये जी अवास्तव व बेशिस्त वाढ होत आहे त्यामुळे ' मिटर रूम ' मध्ये जास्तीत जास्त मिटर लावले जात असून प्रसंगी ही संख्या १०० मिटर पर्यंत गेलेली आहे. सबब मुलत: ' सिम्हा-९७ ' ही योजना झोपडपट्टीमध्ये नविन विजपुरवठा करणे कामी विचारांत घेतली जाते. प्रसंगी जुन्या विजपुरवठा असलेल्या झोपड्या या संधारणा केबीन पासून अतिदूर अंतरावर व जिर्ण अवस्थेत असतील, तरच अपवादात्मक परिस्थीती मध्ये त्यांना ' सिम्हा-९७ ' चा फायदा देणेत येतो.

२४. लक्षात ठेवण्याचा महत्वाचा मुद्दा म्हणजे ' सिम्हा-९७ ' योजने अंतर्गत जाबदेणार बेस्ट उपक्रमाला झोपडपट्टीमध्ये त्यांचे खर्चाने योग्य अंतरावर ' लाकडी मिटर बॉक्स ' बसवावे लागतात, जेणे करून संबधीत झोपड्यांच्या जवळपास अशा तऱ्हेचे मिटर बॉक्स उपलब्ध असतील व त्यामुळे योग्य दाबांचा विद्युत पुरवठा अशा झोपड्यांना अखंडीतपणे व कुठल्याही नुकसानी शिवाय मिळत राहील.

२५. ' सिम्हा-९७ ' योजनेचे स्वरूप व व्याप्ती विचारात घेता, या मंचास असे आढळून येत आहे की तक्रारदारांच्या झोपड्या या ' मिटर रूम ' पासून किती अंतरावर आहेत व तक्रारदारांस मिटरपाशी मिळणारा विद्युतदाब (voltage) व प्रत्यक्ष त्यांचे झोपडीमध्ये मिळणारा विद्युतदाब (voltage) या संबंधीची माहीती व पुरावा या मंचा समोर तक्रारदाराने सादर केलेला नसल्याचे आढळून येते. उलटपक्षी जाबदेणार बेस्ट उपक्रम यांनी निशाणी क्र. 'ल' सोबत प्रत्येक तक्रारदाराच्या नांवासह त्यांचा मिटर नंबर, सर्व्हिस नंबर, त्यांच्या झोपडीचे मिटर रूम पासूनचे अंतर तसेच मिटर मध्ये विजपुरठा किती दाबाने दिला जातो व प्रत्यक्ष झोपडीमध्ये किती दाबाने विजपुरवठा उपलब्ध होत आहे तसेच मंजूर विजपुरवठा व प्रत्यक्ष वापरात असलेला विजपुरवठा हा आकडेवरीनिशी तपशीलवार सादर केलेला आहे.

२६. जाबदेणार बेस्ट उपक्रम यांचे निशाणी क्र. 'ल' सोबत असलेल्या तक्त्यानुसार या मंचास असे आढळुन येत आहे की, सर्व तक्रारदारांच्या झोपड्या ह्या मिटर केबिन पासून साधारणत: ४०/५० मिटर्स अंतराच्या टप्प्यामध्ये आहेत. सबब तक्रारदारांच्या निवेदना प्रमाणे त्या खूप अंतरावर आहेत असे या मंचास आढळून येत नाही. शिवाय संबधीत तक्रारदारांच्या मिटरमध्ये देणेत आलेल्या विद्युत पुरवठ्याचा 'दाब' व त्यांचे झोपडी मध्ये उपलब्ध असलेल्या विजपुरवठयांच्या दाबामध्ये तक्रारदारांने कथन केले प्रमाणे तफावत या मंचास मुळीच आढळून येत नाही. किंबहूना या मंचास असे आढळून येत आहे की तक्रारदारांस मंजुर असलेल्या ' विजपुरवठा - लोड ' पेक्षा प्रत्यक्षात जास्त लोडने विजपुरवठा वापरला जात आहे. वास्तविक मंजुर विजपुरवठा - लोड प्रमाणेच तक्रारदाराने विजेचा वापर करणे आवश्यक आहे अन्यथा जादा लोड साठी रितसर अर्ज करून तो मंजुर करून घेणे क्रमप्राप्त होते. तथापि अशातऱ्हेचा मागणी अर्ज तक्रारदारांनी सादर केलेला नसल्याचे या मंचास आढळून येत आहे. या ठिकाणी विचारांत घेण्याचा मुद्दा म्हणजे तक्रारदारातर्फे, निशाणी क्र. 'ल' मध्ये जाबदेणारातर्फे सादर केलेली आकडेवारी ही योग्य नसलेबाबत सिध्द करणेचा कोणताही प्रयत्न तक्रारदारातर्फे झालेचा या मंचास आढळून येत नाही. सबब हे मंच निशाणी क्र. 'ल' पुरावा म्हणून विचारात घेत आहे.

२७. जाबदेणार बेस्ट उपक्रम यांनी या मंचासमोर तक्रारदारांचे संबधीत असलेल्या झोपड्या, मिटर रूम व वायरींगची प्रत्यक्ष स्थिती दर्शीविणारे फोटोग्राफ निशाणी क्र. ' ग व ड ' सोबत जोडलेले आहे. या फोटोची पाहणी करीता या मंचास तक्रारदारांची . 'झोपडी' ही झोपडी नसून पक्क्या बांधकामाची घरे असलेचे आढळून येत आहे. शिवाय तक्रारदारांची घरे ही बैठी नसून दोन मजली पर्यन्त असलेचे ही आढळून येत आहे. सबब जाबदेणार यांचे कथना अन्वये या मंचास अर्जदारांच्या कथीत ' झोपडया ' या 'सिम्हा-९७' योजने अंतर्गत अपेक्षित असलेल्या . 'झोपडी' या संकल्पनेत बसत नसलेचे आढळून येत आहे. या शिवाय अर्जदारांकडे असलेले विद्युत मिटर हे पक्क्या स्वरूपाच्या 'मिटर रूम' मध्ये बसविणेत आलेले आढळून येत आहे. सबब अशा पक्क्या स्वरूपाच्या मिटर रूम मधुन . 'मिटर्स' काढून ' सिम्हा-९७ योजने ' अतंर्गत लाकडी-मिटर बॉक्समध्ये ती स्थलांतरीत करणे मागे तक्रारदारांच्या असलेल्या ' हेतू ' बाबत जाबदेणारांनी उपस्थित केलेल्या शंकेमध्ये या मंचास तथ्थ असलेचे आढळून येत आहे.

२८. या संदर्भात जाबदेणार बेस्ट उपक्रम यांनी निवेदन सादर केले अन्वये 'मिटर रूम' ही योग्य व सुरक्षित स्थितीतीमध्ये ठेवणे ही तक्रारदारग्राहकांची जबाबदारी आहे. तथापि या मंचासमोर सादर करण्यात आलेल्या फोटो वरून 'मिटर रूम' ही सुस्थीतीमध्ये व सुरक्षित ठेवणे बाबतची कोणतीही तसदी तथा काळजी तक्रारदारांनी घेतलेली या मंचास आढळून येत नाही. किंबहूना मिटर-रूम चा वापर हा ' स्टोअर-रूम ' म्हणून केलेचेही आढळून येत आहे. काही फोटोग्राफमध्ये 'मिटर रूम' ही तक्रारदारांच्या घराचाच एक ' भाग ' असलेचे आढळून येत आहे. काही मिटर रूममध्ये मिटर्स व फ्युज हे जमिनीच्या पातळीवर आणून ठेवलेले आहेत.

२९. आश्चर्याची बाब म्हणजे 'मिटर केबीन' या सुस्थीतीमध्ये ठेवणेची पूर्ण जबाबदारी ही तक्रारदारांची असतानाही विचाराधीन तक्रारीमध्ये सदर ठिकाणी वीजमापकाच्या सर्व केबीन अत्यंत धोकेदायक

अवस्थेत असलेचे विधान करून जाबदेणार बेस्ट उपक्रमांसच तक्रारदार गैररित्या जबाबदार धरीत असलेचे आढळून येत आहे. मिटर पासून संबंधीत तक्रारदारांच्या कथीत झोपड्या पर्यंत जाणाऱ्या 'वायरींग' करीता तक्रारदार जबाबदार असताना, त्याही धोकेदायक स्थितीमध्ये लटकत तक्रारदारांनी ठेवलेचे या मंचास आढळून येत आहे. या संदर्भात तक्रारदारांनी योग्य ती उपाय योजना हाती घ्यावी या करीता जाबदेणार बेस्ट उपक्रम यांनी दि. ७ ऑक्टोंबर २०१० च्या भारतीय विद्युतनियम १९५६ चा नियम ४९ खालील नोटीस सर्व तक्रारदारांना पाठविली असले बाबतचा पुरावा या मंचासमोर निशाणी क्र. 'ई' सोबत जाब देणार यांनी जोडलेला आहे.

३०. उपरोक्त विवेचन व चर्चेनुसार या मंचास असे आढळून येत आहे की तक्रारदांरानी 'मिटर रूम' सुस्थीतीत ठेवण्याची जबाबदारी पार न पाडता, या मिटर रूम स्वत:हून धोकेदायक परिस्थीती मध्ये ठेऊन व या स्वनिर्मीत परिस्थीतीचा आधार घेऊन 'सिम्हा-९७' योजनेचा फायदा मागणे हे अयोग्य, अवाजवी व पूर्णत:गैर असलेचे मतास हे मंच येत आहे. किंबहूना जाबदेणार बेस्ट उपक्रम यांनी त्यांचे नोटीसीमध्ये नमुद केले नुसार पुढील योग्य ती कायदेशिर कार्यवाही या संदर्भात त्वरीत करून पुढील संभाव्य धोके टाळणे आवश्यक असलेचे या मंचास आढळून येत आहे.

३१. प्रस्तुतीच्या तक्रारीमध्ये तक्रारदारापैकी काहींनी अर्ज केला असता, नविन वीज जोडणी दिलेली नसलेबाबतचीही तक्रार केलेली आहे. या संदर्भात जाबदेणार बेस्ट उपक्रम यांनी '१९९५ च्या पुर्वीचा अधिवास' पुरावा मागणे तथा जमीन मालकाचे 'ना हरकत' पत्राची केलेल्या मागणीवरही विविध कारणांवरून तक्रारदार यांनी विचारधीन तक्रारीमध्ये तीव्र आक्षेप सादर केलेले आहेत.

३२. या संदर्भात या मंचाचे मते विद्युत कायदा २००३ मधील कलम ४३ मध्ये अभिप्रेत असलेन्वये 'अधिवासी' **(occupier)** कि ज्याने नविन वीज जोडणी करीता अर्ज केला आहे, तो कायदेशीर 'अधिवासी' असणे अपेक्षित आहे. 'बेकायदेशीर अधिवासी' च्या मद्ती करीता विद्युत कायदा २००३ मधील कलम ४३ ची तरतुद करण्यात आलेली नाही असे या मंचाचे स्पष्ट मत आहे. अर्जदार हा केवळ गरीब आहे, हालाखीच्या परिस्थितीमध्ये राहतो किंवा अन्यगैर मार्गाने विज पुरवठा घेईल म्हणून संबंधीत कायदेशीर तरतुदीकडे डोळेझाक करता येणार नाही. गरीब असो वा नसो, कायद्यामधील तरतुदी या सर्वानाच समानरितीने लागू होतात.

३३. कलम ४३ मध्ये अभिप्रेत 'अधिवासी' कायदेशीर अधिवासी असावा या संदर्भात हे मंच, मा. कलकत्ता उच्च न्यायालयाच्या समसूल हक मोलीक वि. सीईएससी लिमिटेड (एआयआर.२००६ कलकत्ता ७३) मधील दिलेल्या निकालाचा, आधार घेत आहे. या निकालपत्रात मा. कलकत्ता उच्च न्यायालयाने कलम ४३ मधील अभिप्रेत 'अधिवासी' हा 'कायदेशीर अधिवासी' असणे आवश्यक आहे, अशा तऱ्हेचे आपले मत नमूद केलेले आहे.

३४. या मंचाच्या अवलोकनाअन्वये जाबदेणार बेस्ट उपक्रम यांनी निशाणी क्र. 'ख' सोबत जोडलेल्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र शासनाने दि. ०१.०१.१९९५ रोजी अस्तित्वात असणाऱ्या झोपडपट्टीस 'संरक्षित झोपडपट्टी' म्हणून घोषित केले असून, त्या नंतर अस्तित्वात येणाऱ्या झोपडपट्टीस

बेकायदेशीर असलेने वीजपुरवठा देऊ नये बाबतचे आदेश जाबदेणार उपक्रमास दिलेले आहेत. आपल्या मालमत्तेमध्ये राहणाऱ्या 'अधिवासी' मान्यता देणे अथवा न देणे हे सर्वस्वी मालकाच्या अधिकार क्षेत्रात येणारी बाब आहे. सबब मालका कडून अधिवासीस 'नाहरकत ' प्रमाणपत्र आसणे बाबतची मागणी जाबदेणार बेस्ट उपक्रम यानी करणे, यात या मंचास काही गैर वाटत नाही. सबब विचाराधीन तक्रारी मधील झोपडपट्टी रहिवासी हे ०१.०१.१९९५ नंतरचे 'अधिवासी' असलेने त्यांना नविन विज जोडणे नाकरणे मध्ये जाबदेणार बेस्ट उपक्रमचे कडून कोणत्याही कायद्याचे उल्लघन झालेचे या मंचास आढळून येत नाही. सबब या विचाराधीन तक्रारीमधील मुद्यामध्ये या मंचास तथ्थ आढळून येत नाही.

३५. या मंचाचे मते प्रस्तुत तक्रारदारांनी विजपुरवठा वांरवांर खंडीत होणे, वीज संधारण ही धोकेदायक स्थितीमध्ये आहे, वीज चोरी होणे, धोकेदायक परिस्थिती असणे बाबतची विविध व वारेमाप विधाने केलेचे या मंचास आढळून येत आहे. तथापि ही सर्वविधाने अधारहिन व बिनबुडाची असून त्यामध्ये या मंचास तथ्थ आढळून येत नाही. संबंधित विजपुरवठा अधिनियम पाहता मिटर रूम व त्यामधून निघणारी वायरींग ही सुस्थीतीमध्ये ठेवणे ही सर्वस्वी जबाबदारी 'ग्राहकांची ' आहे. उलटपक्षी ती सुस्थीतीत नसतील तर जाबदेणार बेस्ट उपक्रमानेच संबधीत ग्राहकांच्या नजरेस या बाबी आणून, त्या सुस्थीत करवून घेणे आवश्यक आहे. या संदर्भात वर उल्लेख केले प्रमाणे जाबदेणार यांनी नोटीसा पाठविलेल्या असलेचे या मंचास आढळून येत आहे.

३६. उपरोक्त चर्चा व विवेचना वरून विचाराधीन तक्रारीमध्ये काहीही तथ्थ नसलेचे या मंचास आढळून येत आहे. सदरची तक्रार खारीज करीत असताना या मंचास जाबदेणार बेस्ट उपक्रमास प्रस्तुत कथीत झोपडपट्टी मधील मिटर-रूम व वायरींग ही वीजग्राहकांकडून सुस्थीतीमध्ये ठेवली जाईल जेणे करून संभाव्य जिवीत तसेच मालमत्तेची हानी टाळली जाईल, या बाबतची योग्य ती खबरदारी त्वरीत घेणे आवश्यक असलेचे या ठिकाणी नमुद करणे आवश्यक वाटते.

## <u>आदेश</u>

१. तक्रार क्रमांक एन- सिम्हा-१०६-१०दि.१७.०९.२०१० रद्द बातल तथा खारीज करणेत येत आहे.
२. जाबदेणार बेस्ट उपक्रम यांनी संबंधीत मिटर-रूम व वायरींग सुस्थीतीत राहतील या संदर्भात योग्य ती खबरदारी त्वरीत घ्यावी.
३. निकालपत्राच्या प्रती दोन्ही पक्षकारास देण्यात याव्यात.

| | | |
|---|---|---|
| (सौ.वर्षा व. राऊत ) | (श्री.सु.प्या.गोस्वामी) | (श्री.र.उ.इंगुले) |
| सदस्या | सदस्य | अध्यक्ष |